# म.गांधी यांच्या विश्वस्त संकल्पनेतून दारिद्र्य निर्मुलन

**डॉ. संतोष प्रभाकर कावडे,** आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स, कॉलेज आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली,

---

**प्रस्तावना:**

समाजातील, जमीनदार, भांडवलदार अशा श्रीमंतवर्गाने शेतकरी, श्रमिक अशा गरीब जनतेचे'विश्वस्त' ट्रस्टी म्हणून काम पहावे, श्रीमंत लोकांनी आपल्या गरजांची पूर्तता होईल इतकीच संपत्नी जवळ ठेवून जी जास्त संपत्ती आहे, तिचा उपयोग समाजहितासाठी करावा अशारीतीने गांधीजींनी मानवतावादी दृष्टीकोनातून 'विश्वस्त' वृत्तीची संकल्पना समाजापुढे ठेवली आहे.

गांधीजींनी 'विश्वस्त' हा शब्द त्यांच्या"हिंद स्वराज्य ऑर इंडियन होमरूल' या पुस्तकात 1909साली प्रथम वापरला. नंतर 1916 साली त्यांनी बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उदघाटन समारंभात भाषण करताना'विश्वस्तठेव'असा उल्लेख केला होता.

**भांडवलशाही अर्थव्यवस्था:**

गांधीजींनी 1930 साली ब्रिटिश राजवटीतील भांडवलशाही अर्थव्यवस्थेपासून होणारी पिळवणूक पुढील शब्दात व्यक्त केलेली दिसते. "ब्रिटिश राजवटीमुळे आपल्यात निर्माण झालेल्या श्रीमंत, भांडवलदार, जमीनदार, कारखानदार इत्यादी लोकांच्या हितसंबंधाचा अहिंसेच्या मार्गात सर्वात मोठा अडथळा निर्माण झालेला आहे. लोकांचे रक्त पिऊन आपण जगत आहोत, या वस्तुस्थितीची जाणीव या सर्वांना नेहमीच असते असे नाही. त्यांना ही जाणीव होते तेव्हा ते ब्रिटिश राज्यकर्त्याप्रमाणेच अत्यंत निर्दयी होतात,त्यांचेच ते हस्तक बनतात.

आपल्याचरक्ताचे लक्षावधी लोक अर्धपोटी जगत असताना आपण लक्षाधीश – कोट्याधीश असणे हा गुन्हा आहे, म्हणूनच आपण ब्रिटिशांचे हस्तक न राहता रक्तलांच्छित संपत्तीचा त्याग केला पाहिजे याची जाणीव त्यांना करून दिली पाहिजे.अहिंसात्मक मार्गाने श्रीमंत वर्गाचे हृदयपरिवर्तन घडवून आणले पाहिजे" असे गांधी म्हणतात.

**विश्वस्त संकल्पना :-**

संपत्तीचे समान वाटप होण्यासाठी 'विश्वस्त संकल्पना' अंत्यंत उपयुक्त आहे. श्रीमंत, भांडवलदार वर्गाने खाजगी मालमत्तेचा त्याग करून 'विश्वस्ता'ची भूमिका स्वीकारली तर आर्थिक समता अहिंसेच्या मार्गाने प्रस्थापित होईल अशी त्यांची धारणा होती, समाजातील सारी संपत्ती आहे तिचा गरीब, दुःखी जनतेच्या सेवेसाठी उपयोग करावा त्यासाठी मालमत्तेचे विश्वस्त बनावे. तेव्हाच दारिद्र्य निर्मुलन होईल असे गांधीनी मतव्यक्त केले आहे.

प्रयत्नांची शिकस्त करूनही श्रीमंत लोकांनी आपल्या अतिरिक्त धनाचा वापर "विश्वस्तनिधी' म्हणून केला नाही. त्यामुळे गरिब जनता अधिक भरडली "यावरील प्रभावी उपाय म्हणजे असहकार व सविनय कायदेभंग हा होय. अहिंसक मार्गांनी आर्थिक विषमतेच्या फेऱ्यातून स्वत:ची मुक्तता कशी होईल या विषयीची जाणीव सामान्य जनतेला झाली पाहिजे." वास्तविक, भांडवल संचय ही गोष्ट मुळातच वाईट नाही परंतु तिचा दुरुपयोग वाईट आहे. श्रीमंतवर्गाला या गोष्टींची जाणीव करून देणे आवश्यक आहे. असे विचार गांधींनी 'हरिजन' या साप्ताहिकात 1936 व 1940 साली मांडले होते.

प्रथम कोट्यावधी रुपये मिळवायचे व नंतर ते समाजासाठी खर्च करावयचे, अशी 'विश्वस्तवृत्ती'श्रीमंत लोक मान्य करतील का? असा प्रश्न विचारला असता गांधीजी म्हणतात "जे श्रीमंत आहेत किंवा ज्यांचा धनाचा लोभ सुटत नाही त्यांनी आपल्या संपत्तीचा उपयोग समाजासाठी करावा एवढेच मी त्यांना सांगू इच्छितो"

ते म्हणतात. "If each retained possession only of what he needed, no one would be in want and all would live in Contentment"गांधीजीनी आर्थिक विषमता व दारिद्र्य कमी करण्यासाठी शांततापूर्ण, अहिंसात्मक मार्गाची विश्वस्त संकल्पना स्वीकारलेला होता.

**समारोप :-**

एकूणच गांधीजींची विश्वस्त संकल्पनेतूनच दारिद्र्य निर्मुलन करता येईल अशी भूमिका मांडली आहे. भांडवलवादी अर्थव्यवस्थेतून समतेच्या अर्थव्यवस्थेकडे जाणारी गांधीजींची विचारसरणी होती. समान वाटणीच्या मुळाशी श्रीमंतांनी आपल्या मालकीच्या अनावश्यक अतिरिक्त धनाकडे 'विश्वस्त'म्हणून पाहावे हेच तत्व असले पाहिजे. तसेच प्रत्येकाला त्याच्या स्वभाविक गरजा भागविण्याइतके द्रव्य निश्चित मिळावे, पण त्यापेक्षा जास्त मात्र मिळू नये. कोणाही व्यक्तीला हा जिवनक्रम अंगीकारणे केव्हाही शक्य आहे. आणि भांडवलदारानी आपण होऊन हक्क सोडला नाही आणि ते वेळीच जागे झाले नाहीत'तर अज्ञ, भुकेली जनता जागी झाल्यावर सारा देश अराजकाच्या खाईत लोटला जाईल असा गांधीजीनी इशारा दिला आहे. तिच गोष्ट आज श्रीलंकेमध्ये घडताना दिसून येते. म्हणूनच भांडवल दारांचे हृदयपरिवर्तन घडवून आणले तर समाजातील वर्गविग्रहाचा दरी कमी होऊन दारिद्र्य निर्मूलन करणे शक्य आहे, असासकारात्मक दृष्टीकोन गांधीजीनी आपणासमोर ठेवला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1.M.K. Gandhi Autobiography

2.Nimalkumar Bose: Studies in Gandhism

3.S.Radhakrishnan : Mahatma Gandhi : 100 years (editor, Gandhi Peace Foundation, New Delhi)

4.B.B. Patil&chavanUrmila : Indian Political thought-II